MHPU240001112022

## <u>रे. मु. नं. २१/२०२२ मधील निशाणी क्र. १५ खालील आदेश</u>

**१.** प्रतिवादी क्र. १अ व १ड यांनी प्रस्तूतचा अर्ज वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर वादीचे लेखी म्हणणे मागविण्यात आले.

**२.** अर्जातील प्रतिवादींचे कथनानुसार, ते वकिलांमार्फत दाव्यात हजर झाले परंतु कैफियत दाखल करण्यासाठी आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे लवकर उपलब्ध होवू शकली नाही. त्यामुळे प्रतिवादींना मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादींची कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास झालेला ६० दिवसांचा उशीर माफ होवून कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जावर वादीने म्हणणे दाखल केले. वादीच्या म्हणण्यानुसार, अर्जातील प्रतिवादींनी मोघम स्वरुपाचा अर्ज मजकुराबाबत सत्यता दिसून येत नाही. सबब, प्रतिवांदीचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

**४.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा हा जाहिर ठराव व निरंतर मनाई ताकिद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र.१अ व १ड यांना दाव्याच्या नोटीसची बजावणी होवून देखील त्यांनी वादीच्या दाव्यास मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दि. १०.०८.२०२२ रोजी दाखल केलेला असून अर्जात नमूद केलेले कारण

कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. तसेच प्रतिवादी क्र.१अ व १ड यांना कैफियत दाखल करण्यासाठी ६० दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला दिसतो. सदर अर्जातील कथनाचे सत्यतेसाठी प्रतिवादी क्र. १अ जगन्नाथ दादाभाउ पवार यांचे प्रतिज्ञापत्र नि. १६ वर दाखल केले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट, प्रतिवादी क्र. १अ व १ड यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १अ व १ड यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादींचा प्रस्ततचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. शिवाय वादी यांनी प्रतिवादींचे प्रस्तुत अर्जास स्पष्ट हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. सबब, प्रतिवादी क्र. १अ व १ड यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो खर्च आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१. प्रतिवादी क्र. १अ व १ड यांचा प्रस्तुत अर्ज नि. १५ हा मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १अ व १ड यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब त्यांनी एकत्रित रक्कम रू. ४००/— (एकूण रुपये चारशे) खर्च वादींना देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो. प्रतिवादी क्र. १अ व १ड यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

Digitally signed by MEGHA SHANKARRAO MALI
Date: 2022.12.06 18:01:54 +0530

घोडेगाव
दिनांक — ०६.१२.२०२२

(एम. एस. माळी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव, जि. पुणे